**प्रेसनोट** दि. १०/०३/२०२३.

जिल्हा परिषद - लघु पाटबंधारे विभाग, उपविभाग-इंदापूर येथील
कनिष्ठ अभियंता व खाजगी इसमावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.रं.नं. १३६/२०२३. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, १२. |
| तक्रारदार | पुरूष, वय - २६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक संदिप मारुती गोंजारी, वय ४३ वर्ष, पद - कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद - लघु पाटबंधारे विभाग, उपविभाग - इंदापूर, जि. पुणे.<br>२) रणजीत प्रकाश सुर्यवंशी, वय ४० वर्ष, (खाजगी इसम) रा. इंदापूर, जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,५०,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,५०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | ०९/०३/२०२३ |
| सापळा दिनांक | ०९/०३/२०२३ रोजी सायंकाळी |

ठिकाण :- जळोची रोड येथील हॉटेलमध्ये, बारामती, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची भूसंपादन केलेल्या जमीनीचा वाढीव मोबदल्याचा प्रस्ताव प्रांत कार्यालय येथे पाठविण्याकरीता लोकसेवक संदिप गोंजारी यांनी २,६०,०००/- रुपयांची (दोन लाख साठ हजार रुपये) लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक- कनिष्ठ अभियंता संदिप गोंजारी यानी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती २,५०,०००/- रुपयांची (अडीच लाख रुपये) मागणी केली व त्यांचे सोबतचे खाजगी इसम रणजीत सुर्यवंशी यानी लाच मागणीस सहाय्य करुन लोकसेवक गोंजारी यांचेवतीने २,५०,०००/- रुपये लाच रक्कम स्वीकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, बारामती तालुका पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दोघांना अटक करून विशेष न्यायालय, बारामती येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दि. १३/०३/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.